**Sakal – Dated 9th January 2016.**

कारवाई केल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. शिवाय,

# 'जीवनमूल्यांचे शिक्षण मुलांसाठी आवश्यक'

पुणे, ता. १० : मुलांच्या अभ्यासावर कष्ट आपण सर्वच जण घेत असतो. मात्र, मुलांच्या सर्वांगीण शिक्षणासाठीदेखील तेवढेच प्रयत्न व्हायला हवेत. आजची लहान मुले उद्या 'चांगला माणूस' म्हणून ओळखली जावीत, यासाठी जीवनमूल्यांचे शिक्षण नियमित अभ्यासाएवढेच आवश्यक ठरते, असे मत सहायक शिक्षण अधिकारी मीनाक्षी राऊत यांनी येथे व्यक्त केले.

पंख संस्थेने आयोजित केलेल्या 'जीवनमूल्य शिक्षण प्रकल्प' या उपक्रमासंबंधीच्या एका कार्यक्रमात राऊत शुक्रवारी बोलत होत्या. या वेळी 'पंख'च्या अध्यक्ष स्मिता आपटे, अजय शिर्के आदी उपस्थित होते.

जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पामुळे वस्त्यांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या आयुष्यात नक्की काय सकारात्मक फरक पडला, यावर या कार्यक्रमातून प्रकाश टाकण्यात आला. राऊत म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांनी आपल्यातील 'चांगलं-वाईट निवडण्याच्या' क्षमतेचा शोध घ्यायला हवा. चांगल्या क्षमता विकसित होऊ शकतात. मात्र त्यासाठी, मूल्यशिक्षण देताना पालकांनीही त्यांचा पाल्यांशी संवाद वाढविणे गरजेचे आहे.''